महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे ४११०१६.

जा.क्र. : तंशिविकापु/शै.वि.-४/२०२४/ 3681 दिनांक : ०४.०९.२०२४

04 SEP 2024

**परिपत्रकः**

प्रति,
प्राचार्य / संचालक,
शासकीय, अशासकीय अनुदानित व खाजगी विनाअनुदानित (पुणे जिल्हा)
पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या संस्था
पुणे विभाग.

**विषय : विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४**
**(महाविद्यालयातील कॅम्पस ॲम्बेसिडर यांचे गुरुवार दि. ०५.०९.२०२४ रोजी आयोजित प्रशिक्षणाबाबत)**

संदर्भ : १) उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्र. १३, पुणे यांचे पत्र क्र. उभूसंक्र १३/आस्था-१/कावि/९०/२०२४ दि २२.०७.२०२४.
२) उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्र. १३, पुणे यांचे पत्र क्र. उभूसंक्र १३/आस्था-१/कावि/२३/२०२४ दि ०२.०९.२०२४.
३) या विभागीय कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. तंशिविकापु/शै.वि.-४/२०२४/३६७० दिनांक ०३.०९.२०२४.

उपरोक्त विषयास अनुसरुन, संदर्भ क्रमांक १ मधील पत्रान्वये प्राप्त निर्देशांनुसार या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त पुणे जिल्ह्यातील पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये प्रथम व थेट द्वितीय वर्षासाठी विविध अभ्यासक्रमात प्रवेश घेणा-या सर्व विद्यार्थ्यांचे मतदार नाव नोंदणी करण्याकरिता प्रत्येक संस्थेतील कार्यरत एक अधिव्याख्याता यांची नोडल अधिकारी व शिकत असलेल्या विद्यार्थ्यांची मतदार राजदूत (कॅम्पस ॲम्बॅसिडर) म्हणून नेमणूक करणेबाबत या विभागीय कार्यालयामार्फत कळविण्यात आलेले होते.

संस्थांमधील नियुक्त केलेल्या कॅम्पस ॲम्बॅसिडर यांचे मा. जिल्हाधिकारी कार्यालय, बहुउद्देशीय हॉल, ५ वा मजला येथे दिनांक ०५.०९.२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित प्रशिक्षणास उपस्थित रहाणेबाबत विभागीय कार्यालयाच्या संदर्भ क्रमांक ३ मधील परिपत्रकाद्वारे कळविण्यात आले होते.

महाराष्ट्र राज्यामधील विधानसभेच्या सार्वत्रिक निवडूक २०२४ चा तपशिलवार कार्यक्रम लवकरच निश्चित होणार आहे. सदर कामकाज राज्याच्या दृष्टीने संवेदनशील असल्यामुळे सदर कामकाजास सर्व स्तरावरुन प्राधान्य देण्यात येत आहे. यास्तव उद्या दिनांक ०५.०९.२०२४ रोजीच्या प्रशिक्षणास मतदार राजदूत (कॅम्पस ॲम्बॅसिडर) यांचेसह संस्थेतील सदर कामामरिता नियुक्त केलेले **नोडल अधिकारी यांनी सुध्दा उपस्थित** राहण्याबाबतच्या सूचना जिल्हाधिकारी कार्यालयाकडून या विभागीय कार्यालयास प्राप्त झालेल्या आहेत.

**सबब सर्व संस्थांना कळविण्यात येते की, संस्थेतील नोडल अधिकारी व मतदार राजदूत (कॅम्पस ॲम्बॅसिडर) यांनी सदर प्रशिक्षणास आवर्जून उपस्थित रहावे व आपली उपस्थिती या विभागीय कार्यालयाच्या प्रतिनिधीकडे नोंदवावी. तसेच ज्या संस्थेतील नोडल अधिकारी व मतदार राजदूत (कॅम्पस ॲम्बॅसिडर) प्रशिक्षणास गैरहजर राहतील त्यांच्यावर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत शिस्तभंगाची कार्यवाही झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुखांची राहील याची नोंद घ्यावी.**

(मा. रा. जाधव)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.